# ३६४ पदांना आणि खर्चास राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात दीड वर्षांपूर्वी स्थापन करण्यात आलेल्या अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सला आता अधिकारी कर्मचाऱ्यांचे बळ प्राप्त झाले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत ३४६ पदांना आणि त्यासाठीच्या खर्चास मंजुरी देण्यात आली.

३१ ऑगस्ट २०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यात आला होता. या फोर्ससाठी आवश्यक असणाऱ्या ३४६ पदांच्या मनुष्यबळाचा प्रस्तावास आज मंजूरी देण्यात आली. यापैकी ३१० पदे नियमित असतील तर ३६ पदे बाह्य यंत्रणेकडून भरली जाणार आहेत. नियमित पदांमध्ये विशेष पोलीस महानिरीक्षक–१, पोलीस उपमहानिरीक्षक १, पोलीस अधीक्षक–३, अतिरिक्त पोलीस अधीक्षक–३, पोलीस अधीक्षक–१०, पोलीस निरीक्षक १५, सहाय्यक पोलीस निरीक्षक – १५, पोलीस उपनिरीक्षक – २०, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक – ३५, पोलीस हवालदार – ४८, पोलीस शिपाई – ८३, चालक पोलीस हवालदार –१८, चालक पोलीस शिपाई –३२, कार्यालय अधीक्षक – १, प्रमुख लिपीक – २, वरिष्ठ श्रेणी लिपीक –११, कनिष्ठ श्रेणी लिपीक – ७, उच्च श्रेणी लघुलेखक – २, निम्न श्रेणी लघुलेखक – ३ यांचा समावेश आहे.

**बाह्य यंत्रणेद्वारे भरावयाची पदे–** वैज्ञानिक सहाय्यक–३, विधी अधिकारी – ३, कार्यालयीन शिपाई –१८, सफाईगार – १२ एकूण अशी ३६ पदे भरली जाणार आहेत.

# झेडपीच्या शाळांमध्ये ओपन सायन्स पार्क

## ४ ठिकाणी कामे पूर्ण : वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागावा, विज्ञान विषयक संकल्पना दृढ व्हाव्यात, प्रत्यक्ष अनुभवाद्वारे कृतियुक्त शिक्षण मिळावे, कुतूहल व शोधनवृत्ती निर्माण व्हावी, यासाठी शिक्षण विभागातर्फे मागील वर्षी जिल्ह्यातील ५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ओपन सायन्स पार्कसाठी निवडण्यात आल्या होत्या. त्यातील ४ शाळांमध्ये हे पार्क उभारले असून एक प्रगतीपथावर आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्ह्यातील ५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ओपन सायन्स पार्कसाठी निवडण्यात आल्या होत्या. त्यासाठी मागील वर्षी २०२४–२५च्या अर्थसंकल्पात ५० लाखांची तरतूद करण्यात आली होती. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, संवत्सर (ता. कोपरगाव), जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा कासार (ता. नगर), जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पानोली (ता. पारनेर), जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काष्टी (ता. श्रीगोंदा) व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (कोळगाव, ता. श्रीगोंदा) या शाळांचा समावेश करण्यात आला आहे.

> ओपन सायन्स पार्क मला खूप आवडले. यामध्ये विज्ञानामधील रॉकेट, सूर्यमाला आकाशगंगा, पवनचक्की हे प्रत्यक्ष पाहायला मिळाले. त्यामुळे मी नियमित शाळेत येते.
> **–समृद्धी चौधरी,** चौथी, जि. प. शाळा, सारोळा कासार

> संवत्सर शाळेमध्ये ओपन सायन्स पार्कची उभारणी करण्यात आलेली आहे. एकूण २२ प्रकारचे साहित्य त्यात आहे. साहित्याची उभारणी आकर्षक पद्धतीने केली आहे. यामुळे वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होण्यास मदत होत आहे.
> **–नाजमीन शेख,** पालक, संवत्सर, ता. कोपरगाव

यामधील संवत्सर, सारोळा कासार, काष्टी व पानोली या शाळांमधील काम पूर्ण झाले असून कोळगाव या शाळेतील काम प्रगतीपथावर आहे. ओपन सायन्स पार्कमध्ये एकूण २२ विद्यानविषयक व माहिती फलक उपकरणे स्थापित करण्यात आले आहेत. या शाळांमधील ओपन सायन्स पार्कचा नजीकच्या शाळेतील विद्यार्थी देखील लाभ घेत आहेत. ओपन सायन्स पार्क विकसित केल्यामुळे, आनंददायी शिक्षणातून विज्ञान संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजत आहेत. विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण होऊन शाळेची गोडी वाढत आहे. यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यासाठी मदत होत आहे.

# म. सा. प.कार्यकारिणीला आव्हान देणारी याचिका दाखल करून घेण्यास धर्मादाय आयुक्तांची अनुमती

**पुणे (प्रतिनिधी)–** करोनाच्या काळात महाराष्ट्र साहित्य परिषदेने विद्यमान कार्यकारिणीला दिलेल्या मुदवाढीस आव्हान देणारी याचिका दाखल करून घेण्यासाठी धर्मादाय आयुक्ताने मंगळवारी अनुमती दिली.

करोनाच्या काळात पुण्यातील साहित्य परिषद कार्यसमितीने निवडणूक न घेता मुदतवाढ करून घेतली. ती आजतागायत कायम आहे. दरम्यान, परिषदेच्या या निर्णयाला विरोध करण्यासाठी आजीव सभासद विजय शेंडगे यांनी आव्हान याचिका दाखल केली होती. ही याचिका सह धर्मादाय आयुक्त परदेशी यांनी दाखल करून घेण्यास अनुमती दिली आहे. निर्णय देताना सह धर्मादाय आयुक्त परदेशी यांनी विजय शेंडगे यांच्यावर साहित्य परिषद पदाधिकारी यांनी केलेल्या व्यक्तीगत आरोप बाबत अथवा आजीव सभासदत्व रद्द करणे, याची दखल घेतली नाही. तसेच २०२१ यावर्षी मागील कार्यकारिणीची मुदत संपल्यानंतर कार्यकारिणीची झालेली मुदतवाढ वैध का अवैध याची सुनावणी होणे गरजेचे आहे. परिणामी शेंडगे यांची याचिका दखल करून घेणे विश्वस्त कायद्याचा आधाराने आहे, हे स्पष्ट केले आहे. या निकालाचे महाराष्ट्र साहित्य परिषद संरक्षण कृती समितीचे कार्याध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी स्वागत केले आहे. या निकालामुळे साहित्य परिषदेचा घटना विरोधी कार्यकारिणी विरोधी लढा अधिक बळकट झाला आहे.

# जरांगे पाटील पहाटे–पहाटे वाल्मिक कराडला का भेटले?– हाके

**पुणे (प्रतिनिधी)–** सुरेश धस लोकनियुक्त आमदार आहेत. ते एका मंत्र्याला भेटले तर त्यात काही वावगं, नाही. मात्र, जरांगे पाटील पहाटे–पहाटे वाल्मिक कराडला का भेटले? हे महाराष्ट्राला कळणं आवश्यक आहे, असे ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी आव्हान दिले आहे.

बीड प्रकरणावरून सध्या राज्यातील राजकारण चांगल तापले आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी दोनदा गुप्त भेट घेतली असल्याचे समोर आल्यानंतर या प्रकरणांने वेगळच वळण घेतलं आहे. आमदार धस यांनी प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी मुंडे यांची भेट घेतली असल्याचा खुलासा केला. तर या भेटीनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सुरेश धस यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त करत जोरदार टीका केली आहे. यानंतर लक्ष्मण हाके यांनी धसांच्या बाजूने मैदानात उतरल्याचे पाहायला मिळत आहे.

पुण्यामध्ये पत्रकारांशी संवाद साधताना लक्ष्मण हाके म्हणाले, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि वाल्मिक कराड यांची भेट पाच महिन्यापूर्वी पहाटे–पहाटे ज्या अर्थाने झाली होती. त्याच अर्थाने भाजप आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांची भेट झाली असावी. या दोन्ही भेटींकडे मी वेगळ्या भावनेने बघत नाही.

## पान १ वरुन

### अश्लील सामग्रीबाबत कठोर...

आणि न्या. एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर याची सुनावणी झाली. तसेच, जर सरकार यासंदर्भात काही नियम करणार असेल तर न्यायालयाला आनंदच होईल, असेही खंडपीठाने म्हटले आहे.

ॲटोर्नी जनरल आर. वेंकटरमानी आणि सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरील अश्लील साहित्याच्या नियमांबाबत केंद्र सरकारला मदत करण्याबाबतच्या सूचना देखील खंडपीठाने दिल्या. तसेच या दोघांना पुढील सुनावणीस उपस्थित राहण्याचे आदेशही दिले आहेत. इंडियाज गॉट लेटेंट या कार्यक्रमात रणवीर अलाहाबादिया याने केलेल्या अत्यंत वाईट टिप्पणीवरून त्याच्याविरोधात ठिकठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हे सगळे गुन्हे एकत्र करण्याची मागणी यावेळी याचिकेद्वारे रणवीरने केली होती. त्या याचिकेवरील सुनावणी दरम्यान न्यायालयाने हे आदेश दिले.

### सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना

आवश्यक पद निर्मिती करण्यास, आयोगाचे कामकाज अधिक परिणामकारकरित्या चालण्यासाठी आवश्यक कार्यालय आणि आवर्ती–अनावर्ती खर्चासाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करण्याचे मंत्रिमंडळाने मान्य केले.

सहावा राज्य वित्त आयोग पंचायती आणि नगरपालिका यांच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करून राज्याकडून वसूल करायच्या कर, शुल्क, पथकर आणि फी यांच्यापासून मिळणाऱ्या संविधानाच्या भाग नऊ तसेच नऊ–अ अन्वये, पंचायती आणि नगरपालिका यांच्यात विभागून द्यायचे निव्वळ उत्पन्न, पंचायती आणि नगरपालिका यांच्यात विभागणी करणे तसेच अशा उत्पन्नाची पंचायती आणि नगरपालिका यांच्या सर्व स्तरांवरील त्यांच्या हिश्श्यांचे वाटप करणे, याबाबत शिफारस करेल.

आयोगाला पुढील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निधी व्यवस्थापनासाठी चांगल्या कार्यपद्धती, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या चांगल्या आर्थिक व्यवस्थापनासाठी इतर काही संबंधित बाबीसंदर्भात शिफारशी करता येतील. केंद्रीय वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन राज्य आयोगाला शिफारस करता येणार आहे. शिफारशी करतेवेळी करातील हिस्सा, शुल्क आणि सहाय्यक अनुदान निर्धारित करताना लोकसंख्या हा आधारभूत घटक असेल. त्यासाठी आयोग सन २०११ च्या जनगणनेतील लोकसंख्येची आकडेवारी विचारात घेईल.

### 'माध्यमिक'साठी १२२ अर्ज दाखल

अर्ज दाखल झालेले आहेत.

जिल्हा निबंधक गणेश पुरी यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत वेगवेगळ्या मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल झाले असून गुरूवार आणि शुक्रवारअखेरचा दिवस असल्याने यंदा शिक्षक मतदारसंघासाठी विक्रमी उमेदवारी अर्ज दाखल होणार असल्याची शक्यता आहे.

### सिध्दराम सालीमठ नवे साखर आयुक्त

१४ फेब्रुवारीला जिल्हाधिकारी सालीमठ यांनी दोन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केला होता. सालीमठ मुळचे सोलापूर जिल्ह्यातील असले तरी राहुरी कृषी विद्यापीठातील उच्च शिक्षणाच्यानिमित्ताने नगरशी जोडले होते. त्यांच्या जिल्हाधिकारी पदाच्या कार्यकाळात संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना शासकीय मदत मिळवून देण्यात नगर राज्यात पहिल्या स्थानावर होता. तसेच प्रशासन गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाच्या वापरावरही त्यांनी भर दिला. त्यामुळेच ई–ऑफीसच्या अंमलबजावणीत जिल्हा अग्रेसर राहिला.

गौणखनिज, ई–रेकॉर्ड्स, ई–क्युजेकोर्ट प्रणाली, जलदूतद्वारे टंचाई व्यवस्थापन, भुसंपादन आदीसाठी माहिती तंत्रानाचा प्रभावीपणे वापर करण्यावर सालीमठ यांनी भर दिला. शासकीय यंत्रणेला जनतेच्या दारात नेण्याचा महत्वाकांक्षी उपक्रम त्यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात यशस्वी झाला. २४ लाखाहून अधिक नागरिकांना याचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष लाभ झाला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १२ लाख ६ हजार महिलांना लाभ देण्यात आला. साडेपाच लाख शेतकरी बांधवांनाही पीक विमा योजनेअंतर्गत सामावून घेता आले. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेतील वैयक्तिक लाभार्थी मंजूर प्रकल्प संख्येनुसार जिल्हा गतवर्षी प्रथम क्रमांकावर होता. महाडीबीटी पोर्टलवर १ लाखाहून अधिक शेतकऱ्यांना लाभ देणारा नगर हा राज्यातील एकमेव जिल्हा आहे. मुख्यमंत्री शाश्वत शेतीसिंचन योजनेअंतर्गत राज्यात सर्वाधिक वैयक्तिक शेततळे पूर्ण करण्याचा मान जिल्ह्याला मिळाला आहे.

दरम्यान सालीमठ यांच्यासह कोकण विभागाचे विभागीय आयुक्त राजेश देशमुख, नयना गुंडे यांची नाशिक आदिवासी विकास आयुक्तपदावरून पुण्यात महिला व बालकल्याण आयुक्त म्हणून बदली झाली आहे. तर विमला आर या आता नवी दिल्लीत महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आणि सचिव असणार आहेत. मिलिंदकुमार साळवे यांची भंडारा येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी पदावर तर धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे हे सोलापूर महानगरपालिकेत आयुक्त पदावर, राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या नाशिक आयुक्त यांची नाशिकमध्येच आदिवासी विकास आयुक्त म्हणून बदलीचे आदेश असून गडचिरोलीचे सहायक जिल्हाधिकारी राहुल कुमार मीना यांची लातूर झेडपी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

### १६ हजार असंघटित कामगार बेपत्ता!

कामगारांना प्रशासनाकडून शिधापत्रिका देण्यात आल्या. तसेच १६ हजार १३० कामगारांचा माहिती मिळत नसल्याने शिधापत्रिका वाटप रखडले आहे.

लहान आणि सीमांत शेतकरी, शेतमजूर, पशुपालन करणारे, सेल्समन, बांधकाम कामगार, सेंट्रिंग कामगार, किराणा, बेकरी, पानपट्टी, इत्यादी सर्व दुकानदार, सुतार, वीटभट्टीवर काम करणारे, न्हावी, घरगुती कामगार, भाजीपाला विक्रेते, फळविक्रेते, वृत्तपत्र विक्रेते, हातगाडी ओढणारे, ऑटो रिक्षा चालक, घरकाम करणारे कामगार, आशा वर्कर, दूध उत्पादक शेतकरी, सामान्य सेवा केंद्र संचालक, स्थलांतरित कामगार, अंगणवाडी सेविका, खासगी क्लासेस संचालक, विडी कामगार यांचा यात समावेश आहे. मात्र, पोर्टलवरील १६ हजार कामगारांचा संपर्क होत नसल्याने पुरवठा विभाग बेजार झाला आहे.

**ई–श्रम नोंदणीकृत कामगारांसाठी शिधापत्रिका**

स्थलांतरित, असंघटित कामगारांनी ई–श्रम पोर्टलवर नोंदणी केली आहे, पण शिधापत्रिका मिळाली नाही. त्यांच्यासाठी विशेष मोहीम राबविली जात आहे. अशा लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह तहसील कार्यालयात अर्ज केल्यास शिधापत्रिका देण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा विभागाच्यावतीने देण्यात आली.

### हरेगाव कारखान्याचे स्क्रॅब...

रॉबीन बन्सल व श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी जावून पहाणी केली. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तालुका पोलीस करत आहेत.

### बालिका हायस्कूल जवळील...

याप्रमाणे सर्व रस्ते मोकळे करण्यात येत असल्याचे सांगितले आहे. या संदर्भात बाजार सर्कलमधील जे दुकानदार न्यायालयत गेले होते, त्यांना मुख्याधिकाऱ्यांनी पालिकेत बोलावून त्यांच्याशी चर्चा केली. आपण न्यायालयात केस हरला आहात, त्यामुळे आता प्रशासनाला आपले काम करणे भाग आहे, या परिसरातील सर्व अतिक्रमित लोकांनी आपण स्वतःहून पाच दिवसांत अतिक्रमणे काढून घ्यावीत, अन्यथा सहाव्या दिवशी नगरपालिका आपले काम करेल, असे सांगितले.

सदरची जागा खटोड यांच्या मालकीची आहे, असा युक्तीवाद काही दुकानदारांनी केला. मात्र, तेथील अतिक्रमणे काढावी लागतील, असे मुख्याधिकाऱ्यांनी या टपरीधारकांना सांगितल्याचे समजते. अतिक्रमणग्रस्तांनी नगरपालिकेशी संपर्क साधून चर्चेतून मार्ग काढणे, एवढा पर्याय आता शिल्लक आहे. त्यामुळे शहराच्या नगररचना नकाशात मंजुरीनुसार जे रस्ते दाखवलेले आहेत, ते सर्व मोकळे करण्याचा निश्चय नगरपालिकेने केलेला आहे. सर्कल परिसरातील काही दुकानदार सर्व काही माहीत असताना सुद्धा विनाकारण न्यायालयात गेले, परंतू त्यांना स्टे मिळाला नाही. त्यामुळे आता नगरपालिकेला ही अतिक्रमणे काढण्याचा पूर्ण अधिकार आहे. मात्र, दुकानदारांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांना पालिका मुदत देत आहे, असे मुख्याधिकारी श्री. घोलप यांनी सांगितले. दरम्यान शहराच्या इतर भागात देखील नगरपालिकेने रस्त्यांची मार्कींग करून अतिक्रमणधारकांना आपली अतिक्रमणे काढून घेण्याचे, आवाहन केले आहे. पालिकेच्या या आवाहनाला नागरिकही चांगला प्रतिसाद देत असून तोडाफोडीतून नुकसान करून घेण्याऐवजी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून घेत आहेत. शहरातील काही भागात रस्ते अतिशय अरुंद झाले आहेत, त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी ही अतिक्रमण मोहीम शहराच्या सर्वच भागात राबविली जात आहे.

# डान्सबार विरोधी कायद्यात आणखी कडक तरतुदी

## मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव, मात्र चर्चा नाही

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात लागू आलेल्या डान्सबार बंदीबाबतच्या कायद्यात आणखी सुधारणा करून तो अधिक कडक करण्यासंदर्भातील प्रस्ताव मंगळवारी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत येणार होता. मात्र, शेवटच्या क्षणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कायद्यात आणखी सुधारण करून तो पुढील मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केल्याचे समजते. त्यामुळे कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही.

सर्वोच्च न्यायालयाने डान्स बार संदर्भात काही निकाल दिलेले आहेत. त्या निकालांचा तपशीलात अभ्यास करून राज्याच्या कायद्यात बदल करण्यासंदर्भातील आणखी सविस्तर प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्याच्या सूचना फडणवीस यांनी बैठकीत दिल्याचे कळते. त्यामुळे मंत्रिमंडळाकडून सुधारित कायद्याला मंजुरी देऊन पुढील महिन्यात राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबतचे विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत महाराष्ट्र हॉटेल, उपाहरगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यामधील अश्लील नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत तसेच त्यामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ मध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव मांडण्यात येणार होता. परंतु, फडणवीस यांनी यासंदर्भात सुधारणा करण्यापूर्वी आणखी कायदेशीर बाबी तपासण्याची गरज असल्याचे सांगत हा विषय बाजूला ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे नव्या सुधारित कायद्याबाबत बैठकीत चर्चा होऊ शकली नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार डिस्को आणि लाईव्ह ऑर्केस्ट्रासंदर्भात असलेल्या जुन्या डान्स बार कायद्यात बदल करून नवीन तरतुदी केल्या जाणार आहेत.

दिवंगत गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी राज्यातील डान्स बारवर बंदी आणली होती. मात्र, या निर्णयाविरोधात डान्सबार मालक न्यायालयात गेले होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने डान्स बारवरील बंदी हटवत काही अटी अन् शर्तीसह डान्स बार सुरु ठेवण्यास परवानगी दिली होती. त्यानंतर राज्य सरकारने २०१६ साली पुन्हा राज्याचा सुधारित कायदा केला. आता न्यायालयाने पुन्हा त्यात सुधारणा करण्यास सांगितले आहे. डान्सबार फ्लोअरवर चारपेक्षा अधिक बारबाला नसाव्यात, ग्राहकांना डान्स फ्लोअरवर जाण्यास मनाई, ग्राहकांना बारबालांवर पैसे उधळता येणार नाही, ग्राहक आणि बारबाला यांच्यात किमान दोन मीटरचे अंतर असावे, डान्सबारमध्ये धुम्रपानास मनाई, बारबालाचे वय १८ वर्षापेक्षा अधिक असावे, बारमध्ये सीसीटीव्ही असावेत असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार राज्य सरकारला आपल्या कायद्यात बदल करायचे आहेत.

# राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग अखेर कार्यान्वित

## राज्य सरकारची उच्च न्यायालयात माहिती

**मुंबई–** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आयोगाच्या अध्यक्षांसह सचिव आणि दोन सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे, हा आयोग कार्यान्वित झाला आहे, असे राज्य सरकारने मंगळवारी सांगितल्यानंतर उच्च न्यायालयाने यासंदर्भातील जनहित याचिका निकाली काढली.

आयोगाच्या अध्यक्षांसह सचिव आणि दोन सदस्यांची पदे भरताना आवश्यक पात्रतेच्या निकषांचे पालन केले गेले नाही, असा दावा करून याचिकाकर्त्यांनी त्याला आक्षेप घेतला. तसेच, याचिका निकाली काढू नये, अशी विनंती न्यायालयाला केली. परंतु, याचिकाकर्त्याला सदस्यांच्या पात्रतेचा मुद्दा स्वतंत्रपणे उपस्थित करण्याची मुभा आहे, असे स्पष्ट करून मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने जनहित याचिका निकाली काढली.

डिसेंबर २०२० पासून आयोग कार्यान्वित नसल्याचा मुद्दा खेडस्थित सागर शिंदे यांनी जनहित याचिकेद्वारे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला होता. आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांची पदे २०२२ पासून रिक्त असल्याने प्रकरणे प्रलंबित असल्याची न्यायालयानेही गंभीर दखल घेतली होती. तसेच, ही पदे अद्याप रिक्त का, अशी विचारणा करून राज्य सरकारला त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते. त्या पार्श्वभूमीवर, २४ सप्टेंबर रोजीच्या आदेशान्वये आयोगाच्या अध्यक्ष, सचिवपदासह दोन सदस्यांची पदे भरण्यात आल्याची माहिती राज्य सरकारने दिली.

दरम्यान, अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (ॲट्रोसिटी) तक्रार नोंदवली म्हणून आपल्याला औषधालय चालवण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा दावा याचिकाकर्त्याने याचिकेद्वारे केला होता. तक्रारीची दखल खेड पोलिसांनी काही महिन्यांनंतर घेतली आणि गुन्हा नोंदवला. त्यामुळे, पोलिसांच्या कारभाराविरोधात आपण सप्टेंबर २०२३ मध्ये अनुसूचित जाती–जमाती आयोगाकडे धाव घेतली. मात्र, आयोगानेही आपल्या अर्जावर सुनावणी घेतली नाही. त्यामुळे, माहिती अधिकारांतर्गत अर्ज करून आपण त्याबाबत माहिती मागवली होती. त्यावेळी, डिसेंबर २०२२ पासून आयोगापुढे ८७७ प्रकरणे प्रलंबित असल्याचे उघड झाले, असा दावा शिंदे यांनी याचिकेत केला होता.

# मराठीला ज्ञानभाषेत परावर्तीत कररण्याचा प्रयत्न- फडणवीस

**पुणे (प्रतिनिधी)–** सध्या आर्टीफिशियलचा जमाना आहे. त्याचा सगळीकडे बोलबाला पाहायला मिळत आहे. तंत्रज्ञान घोड्यासारखे असते. त्याला घाबरून चालणार नाही आणि नाकारून सुद्धा चालणार नाही. तंत्रज्ञानावर ठाण मांडून बसायचे आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग प्रसार आणि प्रचारासाठी करून, मराठीला ज्ञान भाषेत परावर्तीत करण्याचा प्रयत्न करतोय, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी व्यक्त केले. दरम्यान, पुढच्या पाच वर्षांत एक विश्व मराठी संमेलन परदेशात घेऊन मराठीचा डंक्का वाजविण्यात येईल असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, आमदार बापू पठारे, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, राजेश पांडे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, रंगनाथ पठारे, डॉ. राजा दीक्षित आदी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना साहित्य भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

फडणवीस म्हणाले, आज आपण एआयच्या युगात आहोत. वेबसाइटवर साहित्यिकांचे साहित्य उपलब्ध करून देण्याऐवजी स्मॉल लॅग्वेज मॉडेल तयार करावे. त्यात सर्व साहित्यिकांचे साहित्य टाकले पाहिजे. चॅट जीपीटीला प्रश्न विचारतो, तसा एक प्रश्न या मॉडेला विचारल्यास संबंधित सर्व माहिती एका क्लिकवर मिळू शकेल. मराठी भाषा विभागाने हा प्रयोग करावा. एआयचा उपयोग करुन स्मॉल लॅग्वेज मॉडेल तयार करून, त्या माध्यमातून पुढच्या पिढी करता अभिजात साहित्य कसे पुढे घेऊन जाता येईल, याचा विचार करावा लागेल.

# विद्यार्थिनींच्या वसतिगृहाबाबत सरकारचा मोठा निर्णय

**पुणे–** राज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थिनींसाठी बांधलेल्या वसतिगृहांच्या प्रवेशासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार राज्यभरातील अल्पसंख्यांक मुलींसाठीच्या वसतिगृहातील रिक्त जागांवर अल्पसंख्याक समाजातील दहावी ते बारावी, आयटीआय, पदविका, तंत्रनिकेतनांतील विद्यार्थिनींनाही प्रवेश दिला जाणार असून, या निर्णयामुळे गरजू विद्यार्थिनींची सोय होऊ शकणार आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राज्य सरकारने २०१०मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार राज्यभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे बांधण्यात आली आहेत. या वसतिगृहांतील प्रवेशासाठीचे निकष २०१३ आणि २०२१मध्ये निश्चित करण्यात आले आहेत. मात्र, अल्पसंख्याक समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थिनींना वसतिगृहाचा लाभ घेता येण्यासाठी उच्च शिक्षणाव्यतिरिक्त अन्य विद्यार्थिनींनाही या वसतिगृहांत प्रवेश देण्याचा निर्णय आता घेण्यात आला आहे. अल्पसंख्याक विभागान दिलेल्या निर्देशांनुसार, अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठीच्या वसतिगृहात बारावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. त्यानंतर वसतिगृहात जागा रिक्त राहिल्यास त्या जागांवर दहावी ते बारावी, पदविका, पदविका समकक्ष, आयटीआय, तंत्रनिकेतन संस्थांतील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रवेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यार्थिनींकडून २०१३ आणि २०१४मध्ये निश्चित केलेले शुल्क आकारण्यात याने. वार्षिक आठ लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या विद्यार्थिनींना प्रवेश शुल्क माफ असेल. हा निर्णय लगेचच लागू करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अल्पसंख्याक समाजातील गरजू विद्यार्थिनींच्या निवासाचा प्रश्न सुटणार असल्याचे स्पष्ट होत आहे.